# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली आज बुधवार दि.१३/०५/२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता **"मान्सुनपुर्व कामकाजांचा आढावा व आपत्ती व्यवस्थापन"** बाबत आयुक्त कार्यालय, सभाकक्ष येथे बैठक आयोजीत करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे विविध विभागातील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीम. प्रियंका राजपुत | मा. अति. आयुक्त (२) |
| २. | डॉ. सचिन बांगर | उपायुक्त (मु.) |
| ३. | श्रीम. कविता बोरकर | उपायुक्त |
| ४. | श्री. प्रणाली घोंगे | उपायुक्त |
| ५. | श्री. स्वप्निल सावंत | उपायुक्त |
| ६. | श्री. नितीन मुकणे | कार्यकारी अभियंता (सां.बा.) |
| ७. | श्री. शरद नानेगावकर | कार्यकारी अभियंता (पा. पु.) |
| ८. | श्री. प्रकाश बोराडे | मुख्य अग्निशमन अधिकारी व इतर अग्निशमन अधिकारी |
| ९. | सर्व उपअभियंता | सा.बां व पा.पू |
| १०. | सर्व प्रभागाचे सहा. आयुक्त | प्रभाग कार्यालय क्र. ०१ ते ०६ |
| ११. | श्रीम. दिपाली जोशी | समाजविकास अधिकारी |
| १२. | श्री. दत्तात्रेय वरकुटे | सहा. आयुक्त, जाहिरात विभाग |
| १३. | श्री. अरविंद चाळके | उपमुख्य स्वच्छता अधिकारी |
| १४. | श्री. प्रकाश पवार | स्वच्छता अधिकारी |
| १५. | सर्व स्वच्छता निरीक्षक/ सर्व प्र. स्वच्छता निरीक्षक | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| १६. | श्रीम. ममता डिसोजा | सहा. पोलिस आयुक्त, भाईंदर |
| १७. | श्री. सोहेल शेख | सहा. पोलिस आयुक्त, नवघर |
| १८. | श्री. मेघना बुरांडे | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, मिरा रोड पोलीस ठाणे |
| १९. | श्री. मुकुंद यादव | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, उत्तन सागरी पोलीस ठाणे |
| २०. | श्री. धिरज कोळी | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे |
| २१. | श्री. अमर वि. जगदाळे | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नयानगर पोलीस ठाणे |
| २२. | श्री. राजेंद्र कांबळे | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस ठाणे |
| २३. | श्री. जितेंद्र कांबळे | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, भाईंदर पोलीस ठाणे |
| २४. | श्रीम. तेजस्वी शिंदे | सहा. पोलीस निरीक्षक , काशिगाव पोलीस ठाणे |
| २५. | श्री. प्रफुल्ल वाघ | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतुक पोलीस ठाणे |
| २६. | डॉ. अंकीता भोईर | MO, पंडीत भिमसेन जोशी शासकीय रुग्णालय |
| २७. | श्री. प्रथमेश भुर्के | नायब तहसिलदार, मिरा-भाईंदर |
| २८. | श्री. स्वप्निल पाटील | वन अधिकारी, कांदळवन विभाग |
| २९. | श्रीम. योजना पाटील | अधिक्षक अभियंता, एम.एम.आर.डी.ए. (मेट्रो-९) |
| ३०. | श्री. एस. के. धन अधिकारी | प्रोजेक्ट मॅनेजर, जे कुमार |
| ३१. | श्री. दिपेंद्र सिंग राठोड | मॅनेजर, NHAI |
| ३२. | श्री. रामविनोद राय | A.E. (NH-४८) PIU, Thane. |
| ३३. | विशाल क्षीरसागर | JE, AAI- Mumbai |

| | | |
|---|---|---|
| ३४. | श्री. कोशिरगन विशाल | JE, AAI Mumbai |
| ३५. | श्री. विरेंद्र सापते | Sr. Project Execution Expert, J Kumar |
| ३६. | श्री. सुब्रता कुमार अधिकारी | Project Manager, J Kumar |
| ३७. | श्री. ठाकुर अंकीत सिंग | NBIPL, NHAI |
| ३८. | श्री. प्रशांत पाठक | साईट अभियंता, NHAI |
| ३९. | श्री. प्रतिक तिवाड | साईट अभियंता, NHAI |
| ४०. | श्री. नारायण सिंग | ठेकेदार, आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी |

बैठकी दरम्यान उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) तसेच विविध खाते/संस्थाचे अधिकारी यांनी मांडलेले आपले म्हणणे/अनुभव विचारात घेवून आयुक्त यांनी खालील प्रमाणे सुचना / निर्देश दिले.

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | महानगरपालिका/ नगरपालिका कार्यालये २४x७ आपत्ती नियंत्रण कक्ष स्थापन करणे. | १. उपायुक्त (मु.), आपत्ती व्यवस्थापन<br>२ सहा. आयुक्त, सा.प्र./ आस्थापना विभाग<br>३ सहा. आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन | १) पालिकेचे आपत्ती व्यवस्थापन केंद्र अद्यावत ठेवावेत. भ्रमणध्वनी क्रमांक तपासून घ्यावेत.<br>२) जिल्हाआपत्ती व्यवस्थापन व राज्य आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे क्रमांक, संपर्क अधिकारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंद करावेत.<br>३) NDRF, DDRF प्रमाणेच महापालिकेचे पथक नेमावे.<br>४) तीन पाळीमध्ये कर्मचाऱ्यांच्या नेमणूका कराव्यात, नियंत्रण अधिकारी नेमावेत.<br>५) दैनंदिन पर्जन्यमानाची नोंद घेण्यासाठी २ पाळीमध्ये कर्मचारी नेमावेत.<br>६) आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा तयार करावा. त्याची प्रत सर्व संस्था/आस्थापनांना द्यावी. सर्व क्रमांक अद्यावत ठेवावेत.<br>७) भरती आहोटीचे वेळापत्रक प्रसिध्द करावे. | २० मे २०२६ |
| २. | दहिसर चेकनाका ते सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत मेट्रो-९ अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती करणे. त्याचप्रमाणे पावसाळ्यापुर्वी गटारे/ नाल्याची कामे पुर्ण करणे. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | १) दहिसर चेकनाका ते सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत मेट्रो-९ अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती करणे.<br>२) पावसाळ्या पाणी साचण्याची शक्यता असलेल्या गटारे/ नाल्याची यादी कळविण्यात आलेली आहेत. त्यामध्ये पावसाळया दरम्यान पाणी साचणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावीत. पाण्याचा त्वरीत | २० मे २०२६ |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | निचरा होण्यासाठी आवश्यक ठिकाणी पंपाची तजवीज ठेवावी.<br>३) तसेच मेट्रोचे उर्वरित कामे विहीत कालावधीमध्ये पुर्ण करण्यात यावीत.<br>४) कामाच्या ठिकाणी टाकाऊ माती/ डेब्रिज उचलावीत. तसेच आवश्यक नसलेले साहित्य हटवावेत.<br>५) आवश्यक ठिकाणी दिशादर्शक फलक व रिफलेक्टर लावावेत. आवश्यक ठिकाणी बॅरिगेटींग बसवावेत.<br>६) वाहतुकीचे नियोजन करणेकरीता ट्रॅफिक वॉर्डन नेमावेत. | |
| ३. | दहिसर चेकनाका ते फाऊंटन हॉटेलपर्यंत कल्वर्टची पावसाळ्यापुर्वी साफसफाई करणे. | भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण | दहिसर चेकनाका ते फाऊंटन हॉटेल पर्यंत असणारे कल्वर्टची पावसाळ्यापुर्वी सफाई करून घेण्यात यावीत. पावसाळया दरम्यान पाणी साचणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेच साई पॅलेस हॉटेल शेजारी नाल्यालगत सुरक्षा भिंती उभारण्यात यावी. सदर ठिकाणी कोणतेही जिवीतहानी होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.<br>काशिमिरा नाक्यावरील ब्रिजवर पाणी तुंबुन राहणार नाही याकरीता आऊटलेट पाईप स्वच्छ ठेवावेत. पाण्याचा त्वरीत निचरा होण्यासाठी आवश्यक असल्यास पंपाची तजवीज ठेवावी. | २० मे २०२६ |
| ४. | रेल्वे प्रशासनाच्या कार्यक्षेत्रातील जाफरी खाडी येथे नवीन 5वी व 6वी रेल्वेमार्ग टाकण्याच्या कामाअंतर्गत पुल क्रमांक 72 खाली पावसाळापूर्व गाळ काढणे, स्वच्छता करणे तसेच पाईपलाईन हटविण्याची कार्यवाही करणेबाबत. | वेस्टर्न रेल्वे विभाग/ मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन | नाले सफाई करताना नाल्यामधील तात्पुरते बांधलेले बांध त्वरीत काढुन टाकण्यात यावे. तसेच सदर भागात पावसाळी पाण्याचा निचरा होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी. | २० मे २०२६ |
| ५. | रेल्वे मार्गालगत समांतर असलेल्या नाल्याचे पुनर्बांधकाम, रुंदीकरण तसेच प्रशांत हॉटेल ते फाटक मार्गाकडे जाणाऱ्या कॅबिन | वेस्टर्न रेल्वे विभाग/ मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन | प्रशांत हॉटेल ते फाटक पर्यंत रेल्वे मार्गिकेमध्ये येणारे नाले सफाई करणेकामी आवश्यक ठिकाणी गेट व प्रवेशाची व्यवस्था करण्यात यावी. | २० मे २०२६ |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | रोड परिसरात गेटयुक्त प्रवेश व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात आले. तसेच मिरारोड पोस्ट ऑफिसजवळील रेल्वे आरक्षण काउंटरपासून जाफरी खाडीपर्यंत असलेल्या कच्च्या नाल्याचे पक्क्या नाल्यात रूपांतर करणे | | नालेसफाई कामी तात्काळ नाहरकत दाखला देण्यात यावा. | |
| ६. | मनपा क्षेत्रातील उत्तन, भाईंदर (प.), नवघर, हटकेश, मिरा रोड (पु.) परिसरातील नैसर्गिक नाल्यामध्ये कांदळवनाची झाडे असल्याने पावसाळी पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे | १) विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग<br>२) सहा. आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन | १) मनपा. क्षेत्रातील नैसर्गिक नाल्यामधील कांदळवन भागातील नालेसफाई करणे,<br>२) मृत झाडांची फांद्या काढणे करीता विभागीय वन अधिकारी यांनी आवश्यक परवानगी देण्यात यावी.<br>३) कांदळवन भागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या देखरेखी खाली संयुक्त नालेसफाई करण्यात यावी. | २५ मे २०२६ |
| ७. | दहिसर चेकनाका येथील राजु इंडस्ट्रीजच्या लगत असलेल्या नालेसफाई कामाबाबत. | रिजनल एक्झीक्युटीव्ह डायरेक्टर | दहिसर चेकनाका येथील राजु इंडस्ट्रीजच्या लगत असलेल्या नाल्याची सफाई पावसाळयापुर्वी करण्यात यावी. | २५ मे २०२६ |
| ८. | शहरातील निर्माण करण्यात येणारे नवीन रस्ते, गटारे यांच्या कामाबाबत. | श्री. नितीन मुकणे कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग | १) रस्ते व गटारांची कामे २५ मे २०२६ पर्यंत पुर्ण करुन घेण्यात यावीत.<br>२) रस्त्यावरील डेब्रीज माती संबधित ठेकेदारामार्फत उचलुन घ्यावी<br>३) नवीन गटारे, रस्ते खोदाई करण्यात येणारे माती नाल्यात / गटार राहणार नाही याबाबत दक्षता घेणे.<br>४) शहरातील बंदीस्त मुख्य नाले / गटारे यावरील झाकणे बसविण्यात व्यस्थित बसवावत मोडलेली अथवा ज्या ठिकाण छाकणे नाहीत तेथे बसविण्यात यावीत.<br>५) आवश्यकत्या ठिकाणी बॅरिकेड गेट किंवा अवरोधक गेट तसेच कामाच्या ठळक दिशा दर्शक लावण्यात यावेत. | २५ मे २०२६ |
| ९. | शहरातील मुख्य रस्त्यावर विद्युतीकरण करण्यात आलेले आहेत तसेच नवीन विद्युत वाहणी | श्री. नितीन मुकणे कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग | शहरातील विविध ठिकणी नवीन विद्युत वाहिणी/ दुरूस्ती करण्याचे कामे वेळेत पुर्ण करुन घेण्यात यावीत. | २० मे २०२६ |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | टाकण्याचे काम कंपनी यांच्यामार्फत करण्यात येत आहे. | | सखल भागात पाणी साचल्यामुळे शॉटसर्कीटची शक्यता लक्षात घेता अशा ठिकाणच्या वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे क्रमांक स्थानिक नगरसेवक, स्वच्छता निरिक्षक व सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना द्यावेत. | |
| १०. | गॅस पाईप लाईन अंथरणे व आपत्त कालीन स्थितीत त्वरीत कर्मचारी उपलब्ध करुन देणे बाबत. | व्यवस्थापक महानगर गॅस लिं. | गॅस पाईप लाईन अंथरण्याचे काम लवकरात पूर्ण करावेत.<br>काम पूर्ण झालेल्या ठिकाणचे डेब्रीज व साहित्य उचलून घेण्यात यावे.<br>वायू गळतीची शक्यता लक्षा घेता परिसरात काम करणाऱ्या महानगर गॅस कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे क्रमांक स्थानिक नगरसवेक, सोसायटी पदाधिकारी, प्रभाग अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षास उपलब्ध करुन द्यावेत. | २५ मे २०२६ |
| ११. | नालेसफाई कामाबाबत | श्री. योगेश गुनिजन, सहा आयुक्त (घ.व्य.) | नालेसफाई कामे करण्याकरीता कंत्राटदाराची नेमणुक करण्यात आलेली असुन पावसाळयापुर्वी नालेसफाई पुर्ण होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी. | २५ मे २०२६ |
| १२. | पाणीपुरवठा व मलनि:सारण व्यवस्था विभागाच्या कामाबाबत | श्री. शरद नानेगावकर कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा/ मलनिसारण विभाग | १) शहरातील सर्व पाणी पाईप लाईन / सिव्हरेज व्यवस्था लाईन टाकण्याचे काम वेळेत पुर्ण करून घेण्यात यावीत.<br>२) अपुर्ण कामाच्या ठिकाणी बॅरिकेड गेट किंवा अवरोधक गेट बसविण्यात यावेत.<br>३) कामाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक बसविण्यात यावे.<br>४) महानगरपालिकेच्या मालकीच्या पंप हाऊसच्या ठिकाणी देखील पावसाळयापुर्वी प्रतिबंधात्मक देखभाल दुरुस्तीची कामे (Preventive maintenance) पुर्ण करुन घेण्यात यावीत.<br>५) सर्व जलकुंभांवरती पाणी निजंर्तुकीकरण क्लोरिन व्दारे करुन घेण्यात यावीत. | २५ मे २०२६ |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | ६) अतिवृष्टीमुळे शहरातील सखल भागात पाणी साचल्याने इमारतींच्या साठवण टाकीमध्ये पावसाचे पाणी मिसळल्याने सदर पाण्याच्या टाक्या रिकाम्या करुन त्यांचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी टी.सी.एल. पावडरचा पुरवठा संबंधित सोसाटयांना करण्यात यावा.<br>७)अपुरा पाणी पुरवठा झालेल्या ठिकाणी टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येतो. अशावेळी सदर टँकर याकरीता टी.सी.एल. पावडर पुरवठा करण्याची तजवीज करण्यात यावी.<br>८) पावसाळयामध्ये शहरातील नागरीकांना पिण्याचे पाणी उकळून व गाळून पिण्याची खबरदारी घेण्याबाबत जनजागृती करण्यात यावी.<br>९) नियमितरित्या भुमिगत मलवाहिन्या, मलवाहिन्यावरील मॅनहोल्स साफ-सफाई करण्यात यावी.<br>१०) पावसाळयामध्ये सखल भागात पाणी साचल्याने सदर भागातील मलवाहिन्यावरील मॅनहोल्स उघडून त्याव्दारे पाण्याचा निचरा करण्यात येतो. त्यामुळे त्याभागातील मलनि:सारण केंद्रामध्ये जादाचे पाणी आल्याने मलनि:सारण केंद्रावर अधिकचा भार आल्याने तेथील पंपिंग मशीनरीची क्षमता अपुरी पडल्यास त्याठिकाणी जादाचे पंप तयार ठेवण्याची तजवीज करण्यात यावी.<br>११) सर्व मलनि:सारण केंद्रातील विद्युत व यांत्रिकी उपकरणांची प्रतिबंधात्मक देखभाल दुरुस्तीची कामे (Preventive maintenance) पुर्ण करण्यात यावे.<br>१२) अतिवृष्टीच्या वेळी चेणा नदीच्या पात्राची वेळोवेळी पातळी तपासणी करणेकरीता कर्मचारी नियुक्त करावा. धोक्याची पातळी ओलांडण्याची शक्यता निर्माण झाल्यास अग्निशमन दल व प्रभाग अधिकारी यांना कळवुन | |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | आजुबाजुच्या रहिवाशांना स्थलांतरीत करणेकरीता कळविण्यात यावे. | |
| १३. | घनकचरा व्यवस्थापन विभाग | श्री. योगेश गुणिजन, सहा. आयुक्त (घ.व्य.) | पावसाळी दिवसात आपत्तीच्या दृष्टीकोनातून प्रत्येक प्रभागात २४x७ कालावधीकरीता पथके तयार करुन त्यामध्ये कर्मचारी नियुक्त करण्यात यावीत. तसेच त्यांचे भ्रमणध्वनी क्र. प्रत्येक प्रभाग कार्यालयात प्रसिध्द करण्यात यावेत. तसेच सखल भाग असुन सदर भागामध्ये पावसाळी दिवसामध्ये साचलेले पाणी उपसा करणेसाठी सक्शन पंप उपलब्ध करुन देण्यात यावेत. | २५ मे २०२६ |
| १४. | रस्ते / गटारे/ नाले दुरुस्ती | श्री. नितीन मुकणे, कार्यकारी अभियंता | सार्व. बांधकाम विभाग यांचे मार्फत शहरातील सुरु असलेली रस्ते दुरूस्ती व विकास कामे लवकरात लवकर पुर्ण करावी व ज्या ठिकाणी दुरूस्तीची कामे पावसाळी पुर्वी पुर्ण होणार नाहीत त्याठिकाणी बॅरिगेड/ साईनेज/ रिफलेक्टर तसेच कामाच्या ठळक दिशा दर्शक फलक लावण्यात यावेत. शासकिय व खाजगी संस्थेमार्फत विदयुत वाहिन्या टाकण्याचे काम व दुरुस्तीचे काम पुर्ण करुन रस्ते सुस्थितीत ठेवण्यात यावेत. कामाच्या ठिकाणी टाकाऊ माती/ डेब्रिज उचलावीत. तसेच आवश्यक नसलेले साहित्य हटवावेत. | २५ मे २०२६ |
| १५. | अति धोकादायक इमारती निष्कासित करणे. | सर्व प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. ०१ ते ०६<br>वरीष्ठ पोलिस निरीक्षक (सर्व) | १) प्रभागाचे सहा. आयुक्त यांनी अतिधोकादायक म्हणुन (सी-१ प्रवर्गात) घोषीत करण्यात आलेल्या इमारतींच्या दर्शनी भागात सदरची इमारत अति धोकादायक असल्याबाबत जाहिरात फलक बसविण्यात यावे. तसेच सदर इमारती सभोवताली आवश्यक बॅरिगेड बसविण्यात यावे. तसेच सदर इमारत पोलीस अधिकाऱ्यांच्या सहाय्याने तातडीने रिक्त करुन निष्कासनाची कारवाई पावसाळयापुर्वी करण्यात यावी. २) तसेच ज्या इमारती स्ट्रक्चरल ऑडीट अहवालानुसार (सी-२ ए, सी-२ | ३० मे २०२६ |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | बी, सी-३ प्रवर्गातील) दुरुस्ती योग्य असल्याचे आढळल्यास सदर इमारती धारकांस पावसाळयापुर्वी आवश्यक दुरुस्ती करुन घेण्याबाबत आदेशीत करावे.<br>३) सर्वेक्षणानुसार जर प्रथमदर्शनी इमारत अतिधोकादायक आहे असे आढळुन आल्यास व संबंधित सोसायटी धारकास स्ट्रक्चर ऑडीट करण्याची नोटीस देऊनही त्यांनी ऑडीट न केल्यास अशा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट महापालिकेमार्फत तातडीने करुन घेण्यात यावे. व याकामी कामी येणाऱ्या खर्चाचे देयक मालमत्ता करातुन वसुल करावे.<br>४) प्रभाग क्र. ६ चे सहा. आयुक्त यांनी जनतानगर, काशी येथे टेकडीवरील नागरिकांना अतिवृष्टी वेळी धोकादायक परिस्थिती निर्माण झाल्यास त्यांना अग्निशमन दलाच्या मदतीने सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्यात यावे. | |
| १६. | रस्ते वाहतुक | वरीष्ठ पोलिस निरीक्षक (सर्व)<br>वरीष्ठ पोलिस निरीक्षक (वाहतुक) | अतिवृष्टीच्या वेळी रस्त्यावर पाणी तुंबल्यामुळे वाहतुक सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच वाहतुकीचे नियोजन ट्रॅफिक पोलीस, वॉर्डन यांच्या मदतीने करण्यात यावे. | २५ मे, २०२६ |
| १७. | सार्व. आरोग्य विभाग | १) मुख्य वैदयकिय अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका<br>२) मुख्य वैदयकिय अधिकारी, भारतरत्न भीमसेन जोशी रुग्णालय<br>३) विभागप्रमुख, वाहन विभाग | १) बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी तसेच औषध फवारणी कामगांरामार्फत जेट् स्प्रेद्वारे दैनंदिन सुक्ष्मकृती आराखड्यानुसार वेळोवेळी डासनाशके/ अळीनाशके औषधांची फवारणी करावी.<br>२) "राष्ट्रीय कीटकजन्य रोगनियंत्रण कार्यक्रम" अंतर्गत बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी ताप रुग्णांचे सर्वेक्षण करावे. तापाच्या रुग्णाचे रक्तनमुने घ्यावेत. दुषित आढळून आलेल्या हिवताप रुग्णाला समूळ | २५ मे, २०२६ |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | तपासणे व लेखाजोखा साठा रजिस्टर मध्ये अद्यावत ठेवण्यात यावा.<br>१०) खाजगी रुग्णालय, प्रयोगशाळा यांना नियमित भेटी देऊन दुषित आढळून आलेल्या हिवताप व डेंग्यू रुग्णाचे आरोग्य केंद्र स्तरावर लाईन लिस्ट अद्यावत ठेवून रुग्णांच्या घरी भेट देऊन सदर परीसरात कंटेनर सर्वेक्षण करावे तसेच औषध फवारणी करावी इ.<br>११) साथरोग परिस्थिती निवारणांकरीता महापालिकेअंतर्गत कार्यरत सर्व आरोग्य केंद्र व रुग्णालयात पुरेशाप्रमाणात औषधसाठा उपलब्ध ठेवावा व वैदयकिय पथक २४x७ करीता उपलब्ध करुन देण्यात यावा.<br>१२) मनपाच्या वैदयकिय अधिकाऱ्यांनी तसेच वाहन विभागप्रमुखांनी रुग्णवाहीका वाहन दुरुस्ती करुन २४x७ तासाकरीता प्रभागनिहाय उपलब्ध राहतील याची दक्षता घ्यावी. तसेच वाहन चालक यांचे संपर्क क्रमांक २४x७ करीता कार्यरत राहतील याची दक्षता घ्यावी.<br>१३) भारतरत्न भीमसेन जोशी शासकिय रुग्णालयात वैदयकिय अधिकारी यांनी आपत्तीच्या वेळी आवश्यक वैदयकिय सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्याची तजवीज ठेवावी. तसेच साथरोग नियंत्रणाकरीता पुरेसा आवश्यक औषध साठा उपलब्ध करुन देण्यात यावा. | |
| १८. | आपदग्रस्तांसाठी तात्पुरत्या निवाऱ्याची सोय | १) मुख्य अग्निशमन अधिकारी<br>२) कार्यकारी अभियंता, मिळकत विभाग | आपत्तीच्या वेळी बाधीत नागरिकांना मनपाच्या विविध भागातील ५३ समाजमंदिर इमारतीमध्ये व मनपा शाळांच्या ३२ इमारतीमध्ये स्थलांतरीत करुन निवारा देणे व त्यांना आवश्यक | २५ मे, २०२६ |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | उपचार देण्यात यावेत. कंटेनर सर्वेक्षण करावे. लसीकरणाचे लाभार्थी, गरोदर माता वैद्यकीय अधिकाऱ्याकडे संदर्भित करावे. संशयित क्षयरोग रुग्णांच्या थुंकीचे नमुने प्रयोगशाळेत पाठवावेत.<br>३) सर्व सोसायटी धारकांस साथरोग तसेच हिवताप व डेंग्यु संदर्भात खबरदारी घेणेबाबत जाहिर आव्हानाचे पत्र देण्यात यावे. तसेच इमारतीमध्ये फवारणी वेळापत्रक व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांचे मोबईल नंबर स्टिकरस् लावण्यात यावे.<br>४) कार्यक्षेत्रातील सर्व टायर/ गॅरेज/भंगारवाले यांना हिवताप व डेंग्यु संदर्भात खबरदारी घेणेबाबत जाहिर अहवानाचे पत्र देण्यात यावे.<br>५) वेळोवेळी कार्यक्षेत्रातील तुंबलेले गटार, साचलेले केरकचरा, डासत्योती स्थाने इ. बाबत संबंधित स्वच्छता निरिक्षक यांना कळविण्यात यावे.<br>६) कार्यक्षेत्रातील सोसायटी व नागरीकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करावे व त्याच्यांशी संपर्क साधावा.<br>७) कार्यक्षेत्रात कीटकजन्य आजारांबाबत जनजागृती करणे, गटसभा घेणे, शालेय आरोग्य शिक्षण देणे, जनजागृतीचे साहित्य वाटप करावे.<br>८) कार्यक्षेत्रात कायम डासोत्पत्ती स्थानामध्ये गप्पीमासे सोडणे व गप्पीमासे पैदास केंद्राची देखरेख करावे.<br>९) आरोग्य केंद्रातील उपलब्ध किटकनाशक औषधसाठा वेळोवेळी | |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | ३) सहा. आयुक्त (शिक्षण)<br>४) सर्व प्रभाग अधिकारी (सर्व) | सुविधा पुरविणेची तजवीज करण्यात यावी.<br>निवारा इमारतीच्या चावी त्वरीत उपलब्ध होण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांचे क्रमांक नोंद ठेवावेत. | |
| १९. | धोकादायक झाडे | मुख्य उद्यान अधिक्षक | पावसाळयापुर्वी उदयान व वृक्षप्राधिकरण विभागामार्फत धोकादायक झाडाचा सर्वे करुन घ्यावा. विहीत प्रक्रिया राबवून त्वरीत काढून घ्यावेत. अवास्तव वाढलेल्या झाडांच्या फांदया छाटणीचे काम पुर्ण करण्यात यावे.<br>अतिवृष्टीमुळे झाडे, फांदया पडण्याच्या घटना घडतात. सदर झाडे, फांदया तातडीने हटविणे आवश्यक असल्याने २४x७ करीता यंत्रसामुग्री व मनुष्यबळाचे पथक तयार ठेवण्यात यावे. | २५ मे, २०२६ |
| २०. | जाहिरात विभाग | सहा. आयुक्त (जाहिरात) | महानगरपालिका हद्दीतील सर्व खाजगी व मनपा ठेका होर्डींगचे शासन मान्य स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचे स्टॅबिलिटी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात यावे. तसेच अतिवृष्टीमुळे होर्डिंगच्या स्ट्रक्चर डळमळीत झाल्यास होर्डींग धारकास सदरचे होर्डींगचे स्ट्रक्चर दुरुस्ती अथवा हटविणेकरीता त्यांचेकडे २४X७ कालावधीसाठी पथक उपलब्ध राहील याची तजवीज करावी. | २५ मे, २०२६ |
| २१. | अग्निशमन विभाग | मुख्य अग्निशमन अधिकारी | १) पावसाळया पुर्वी अग्निशमन दलातील सर्व उपलब्ध साहित्याचा साठा तपासुन घ्यावा. तसेच सदर साहित्य सुस्थितीत आहेत किंवा नाही याची व्यक्तीश: खात्री करावी.<br>२) सर्व नादुरुस्त वाहने, बोटी, तराफे दुरूस्ती करुन घेण्यात यावे.<br>३) समुद्र किनारपट्टी भागात चक्रीवादळ निर्माण होण्याची शक्यता झाल्यास नागरीकांना प्रभाग अधिकारी यांच्या मदतीने वेळेवर सुचना देण्यात यावी. तसेच नागरीकांना मनपाच्या | २५ मे, २०२६ |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | मिळकतीमध्ये स्थलांस्थरीत करण्याची दक्षता घेण्यात यावी.<br>४) अग्निशमन दल कार्यालयातील सर्व दुरध्वनी क्रमांक तसेच अधिकारी/ कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक २४x७ करीता उपलब्ध राहतील याची दक्षता घ्यावी.<br>५) अग्निशमन दलातील पट्टीचे पोहोणारे कर्मचारी २४x७ करीता उपलब्ध राहतील याची दक्षता घ्यावी.<br>६) आपत्तीच्या वेळी मच्छीमार संघटना यांची मदत तातडीने होईल याबाबत दक्षता घ्यावी. | |
| २२. | नोडल अधिकारी नेमणे. | सर्व महापालिका विभाग व शासकिय विभाग | महानगरपालिकेच्या सर्व विभागप्रमुख व सर्व शासकिय यंत्रणेचे प्रमुख यांनी आपत्ती निवारणाकरीता संपर्कासाठी नोडल अधिकारी यांची नेमणुक करुन त्यांचे नाव व संपर्क क्रमांक या कार्यालयाकडे उपलब्ध करुन देण्यात यावा. | २५ मे २०२६ |
| २३. | दहिसर चेकनाका ते फाऊंटन हॉटेल पर्यंतच्या रस्त्या लगत डेब्रीज टाकणाऱ्या वाहनांवर नियंत्रण | १)वरिष्ठ वाहतुक पोलीस अधिकारी<br>२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण<br>३) प्रभाग अधिकारी ३-४ | मुंबई येथून वाहने दहिसर चेकनाका ते फाऊंटन हॉटेल पर्यंतच्या रस्त्या लगत डेब्रीज खाली करुन जातात. पावसाळयात सदर डेब्रीज रस्त्यावर येवून वाहनांना अपघात होण्याची शक्यता आहे तसेच पाणी निचरा होण्यास अडथळ निर्माण होतो. यावर नियंत्रण ठेवणेसाठी अशा वाहनांवर संयुक्तपणे कार्यवाही करावी. | |

सर्व संबंधित आस्थापनानी नेमून दिलेली कामे वेळेत काटेकोरपणे पार पाडावीत. आपतकालीन परिस्थिती परस्परांशी समन्वय साधून कामगिरी पार पाडावी. मान्सून कालावधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपले भ्रमणध्वनी बंद रहाणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच कामासाठी नेमलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आपले भ्रमणध्वनी बंद ठेवू नयेत याची सक्त सूचना द्यावी.

(राधाविनोद अ. शर्मा,भा.प्र.से.)
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

१) सर्व संबंधित महापालिका अधिकारी
२) सर्व संबंधित शासकिय/ निमशासकिय कार्यालयाचे अधिकारी
३) सर्व संबंधित पोलीस अधिकारी